# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.

## स्थानिक संस्था कर विभाग.

## जाहिर सूचना.

महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक २० मे २०१३ अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीत जकात कर ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करण्यात आलेला आहे.

स्थानिक संस्था कर नियम २९(१) नुसार प्रत्येक नोंदणीकृत व्यापारी या नियमाच्या अधिनतेने त्याने नमुना "च" मध्ये नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने यथोचितरित्या स्वाक्षरी केलेले संबंधीत वर्षातील नमुना "इ" दोनमध्ये वार्षिक विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर ९० दिवसाच्या आत आयुक्तांस सादर करील असे नमूद आहे. तसेच स्थानिक संस्था कर नियम २९ (२) नुसार आयात करणारा नसलेला प्रत्येक नोंदणीकृत व्यापारी वार्षिक विवरणपत्र सादर करील.

वरील नियमानुसार प्रत्येक नोंदणीकृत व्यापाऱ्याने विवरणपत्र सादर करणे आवश्यक होते. तथापि, बहूतांश व्यवसायिकांनी त्यांचे व्यवसायाचे स्थानिक संस्था कर वार्षिक विवरणपत्र दाखल केलेले नाही.

तरी याव्दारे आवाहन करण्यात येत आहे की, ज्या स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापा-यांनी त्यांचे व्यवसायाशी संबंधीत सन २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६,२०१६-१७ या चार वर्षातील स्थानिक संस्था कर वार्षिक विवरणपत्र दाखल केलेले नसतील, अशा व्यापा-यांनी दिनांक ३१ जुलै,२०१७ पर्यंत त्यांचे वार्षिक विवरणपत्र महानगरपालिका, स्थानिक संस्था कर विभागाकडे दाखल करावेत. तसेच,सदर विवरणपत्रांसोबत व्यापा-यांनी त्यांचे व्यवसायांशी संबंधीत सादर करण्यासाठीच्या कागदपत्रांची चेकलिस्ट संबंधित कार्यालयातून अथवा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन (www.bncmc.gov.in) उपलब्ध करुन घ्यावी व त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन सादर कराव्यात.

दिनांक ३१ जुलै,२०१७ पर्यंत जे व्यापारी वार्षिक विवरणपत्र आवश्यक कागदपत्रांसह सादर करणार नाहीत त्यांचे विरुध्द स्थानिक संस्था कर नियमानूसार ३३ (५) नूसार करनिर्धारण प्रस्तावित करुन कर, व्याज व शास्तीच्या वसूलीची दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

14/07/17

(दिपक दे.कुरळेकर)
उपआयुक्त (स्थानिक संस्था कर)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका